# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२

## (सकाळी १०-३० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२, गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून आज अखेरपर्यंत घेण्यात आलेली नसणे, तथापि, त्यासंदर्भात सरळसेवा पदभरतीबाबतची एकही जाहिरात देण्यांत आलेली नसणे, शासनाने सदर परिक्षेकरिता दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सरळसेवा पदभरतीची जाहिरात आलेली नसल्याकारणाने उमेदवार विद्यार्थी परिक्षेस बसण्यास अपात्र होत असल्याचे निदर्शनास येणे, वास्तविकत: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१९ पासून गेल्या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षांबाबत ज्या ३-४ जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या त्यामध्ये ३०ते ४० जागा दिव्यांगाच्या सर्व संवर्गामध्ये भरण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आलेले असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण उमेदवारांसाठी दिनांक १७/१२/२०२१ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वय संपलेले उमेदवार यांना दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत संधी देण्यात यावी, असे परिपत्रक काढण्यांत आलेले असणे, परंतु शासनाने दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, शासनाने दिनांक १७/१२/२०२१ च्या परिपत्रकामध्ये शुध्दीपत्रक काढून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विहित वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करण्याची अनुमती देण्यात यावी म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरतीमध्ये त्यांना संधी मिळेल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी सर्वसाधारण उमेदवारांनी शासनाकडे मागणी करण्यांत येणे, तथापि, अद्यापही शासन स्तरावर कार्यवाही न होणे, त्यामुळे त्याबाबत आंदोलन करण्याची या उमेदवारांवर आलेली पाळी, सदर मागणी प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन सर्वसाधारण (खुल्या) वर्गातील उमेदवारांना न्याय देणे आवश्यक असणे व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**(बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२, गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) ] —**

**(२)** **डॉ. वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, विक्रम काळे, सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना ज्यात प्रामुख्याने मुस्लिम, बौद्ध, जैन, पारसी, शिख विद्यार्थ्यांचा समावेश असणे, अशांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यावर्षी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली जाणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून देणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात येणे, मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळा स्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आर.टी.ई. नुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असल्याने त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करणे, त्यामुळे राज्यातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील राज्यातील सुमारे १० लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकणे, परिणामी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व पालक वर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, अल्पसंख्यांक समाजाकडून केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभर निदर्शने करण्यात येते, सदर शिष्यवृत्ती योजना पूर्ववत करण्याची सातत्याने मागणी अल्पसंख्यांक समाजाकडून होत असणे,केंद्र सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असल्याने पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत सुरु ठेवावी व तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती रक्कमही वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारने मागणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३)] —**

**(३)** **श्री. किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक जिल्ह्यातील येवला मर्चंट को. ऑप. बँकेचे दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी मतदान पार पडणे, सदरील निवडणुकीमध्ये प्रगती पॅनल व समृद्धी हे परस्पर विरोधी पॅनल असणे, सदर मतदान प्रक्रीया सुरु असताना विद्यमान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष व नगरसेविका हे प्रगती पॅनलचे नेतृत्व करीत असणे, दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी येवला शहरातील येवला मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या मतदान केंद्रावरती पॅनल प्रमुख व इतर कार्यकर्ते उभे राहिले असता येवला शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व त्यांचे सहकारी यांनी प्रगती पॅनल प्रमुख व इतरांना धक्काबुक्की करत शिवीगाळ करणे, तसेच त्यांना मारहाण करीत जबरदस्तीने मतदान केंद्रातून बाहेर काढून त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असणे, सदर मतदान केंद्रावर सन्माननीय सदस्य स्वतः उभे असल्याने याबाबत पोलीस निरीक्षक यांनी अडवले असता त्यांनी धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न करणे, तसेच एकेरी भाषा वापरुन सदर ठिकाणाहून निघून जाण्याबाबत दम देणे, त्याच प्रमाणे फायरिंग केली जाईल अशी धमकीही दिलेली असणे, पोलीस निरीक्षक यांच्याकडे सदर निवडणुकीत विरोधी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात खुले आम पैसे वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी करूनही त्यावर दुर्लक्ष करून उलट समृध्दी पॅनलला पाठिशी घालत प्रगती पॅनल प्रमुख व इतर पदाधिकारी यांना मारहाण करण्यात येणे, तसेच लोकप्रतिनिधी यांचाही पोलीस निरीक्षकांनी अवमान केल्याने येवला शहरात पोलीस निरीक्षकांच्या विषयी मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, सदर प्रकरणी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडेही दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी तक्रार केलेली असूनही पोलीस महासंचालक यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, ज्या शहरात लोकप्रतिनिधीच जर अशा अधिकाऱ्यांपासून सुरक्षित नसतील तर सामान्य जनतेला हे कसे संरक्षण देणार, अशी भावना जनमानसात पसरणे, पोलीस निरीक्षकांनी एका लोकप्रतिनिधीचा अवमान केलेला असल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

अप्रकाशित प्रत

**(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (४) ते (६)] —**

(४) **प्रा. राम शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कर्जत तालुक्यात (जि.अहमदनगर) अनेक अनधिकृत खडीक्रश्चर असून त्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी होण्याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, सदर प्रकरणी wild life protection act, १९७२ चेही उल्लंघन होत असल्यामुळे तहसिलदार, कर्जत यांनी चौकशी करुन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चरबाबत व त्यांच्यावर लावलेल्या दंडाबाबतचा अहवाल दिलेला असणे, उक्त प्रकरणी तालुक्यामध्ये एकही अधिकृत खडीक्रश्चर नसताना महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करून रात्री अपरात्री मोठया प्रमाणावर अनधिकृत उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास येणे, कर्जत तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चर प्रकरणाची मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण अधिकारी व खनिजकर्म अधिकारी यांच्यासह त्रिसदस्यीय उच्च समितीमार्फत चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१.१०.२०२२ रोजी बंदरे व खनिकर्म मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असणे, सदर मागणीनुसार चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशत: अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००% अनुदानावर येणे, या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाती सुरु ठेवणे, दि. १ नोव्हेंबर, २००५ पासून नविन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानूसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या

अप्रकाशित

शिक्षकांची शाळा किंवा वर्गतुकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपूरावा करणे, शासनाने यासंबंधीची काढलेली दि. १० जुलै,२०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्म्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जीवनाशी व कुटूंबाशी निगडीत असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **डॉ. मनिषा कायंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात आतापर्यत पार पडलेल्या टीईटी परिक्षेतील ८६ हजार ४११ उमेदवार शिक्षकपदी नियुक्ती होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्य शासनाने सन २०१७ मध्ये पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकांची पदे भरतीची योजना आखली, त्यामध्ये ६ हजार पदांवर भरती केली व उर्वरीत पदांची भरती प्रक्रिया अद्यापही पूर्ण करण्यात आलेली नसणे, तसेच राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची ३१ हजार ४७२ पदे रिक्त असणे, त्यातच राज्य शासनाने कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय, राज्यात मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये सध्या १५ हजार २८४ शिक्षकांची आवश्यकता असणे, पालघर जिल्हयात सर्वाधिक १९१६, यवतमाळ १३०७, रायगडात १०५१, सातारा १०२३, कोल्हापूरात ९७२ शिक्षकांची पदे रिक्त असणे, मोठया प्रमाणात शिक्षक भरती रखडल्यामुळे विदयार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत होत असलेला परिणाम, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून शिक्षकांची भरती प्रक्रिया करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (७) ते (१०)]** —

(७) **ॲड. निरंजन डावखरे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहरातील विविध भागांना जोडणारी रिंग मेट्रो प्रस्तावित असणे, सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या मंजूर विकास आराखडा मधील एच. सी. एम. टी. आर. (HCMTR) म्हणजेच हाय कॅर्पेसिटी मास ट्रान्झिट रेल (HIGH CAPACITY MASS TRANSIT RAIL) याची आखणी व नव्याने प्रस्तावित

अप्रसिद्ध

एम. आर. टी. एस. (MRTS) म्हणजेच मास रॅपिडट्रान्झिट सिस्टीम (MASS RAPID TRANSIT SYSTEM) (THANE METRO), यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यामध्ये विविध त्रुटी असणे, उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा विस्तार कावेसर पर्यंत वाढविला असणे, ठाणे पूर्वेचा भाग संपूर्णपणे MRTS च्या आखणीतून वगळण्यात आला असणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगतीमहामार्ग यादरम्यान, MRTS ची आखणी नव्याने करण्यात आली असून, MRTS चा हा भाग संपूर्णतः भूमिगत असणार असणे, या ठळक मुद्द्यांपैकी उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा केलेला विस्तार हा नक्कीच स्वागतार्ह असणे, मात्र नव्याने विकसित होणाऱ्या भागांना जोडणारी मार्गिका तयार करत असताना ठाणे पूर्व सारख्या अत्यंत जुन्या भागाला या मार्गिकेतून वगळणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगती महामार्ग दरम्यान MRTS च्या नव्याने केलेल्या आखणीनुसार सदर मार्गिका, ठाणे पश्चिमेकडील स्टेशन लगतच्या अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या भागातील सुमारे ५० इमारतींना बाधित करत भूमिगत पद्धतीने प्रस्तावित असणे, सर्वांगीण विचार करता सदर प्रस्तावित भूमिगत मार्गिका अत्यंत अव्यवहार्य असणे, भूमिगत मेट्रोचा खर्च हा उन्नत मेट्रोच्या खर्चाच्या सुमारे चार पट जास्त असतो व त्यामुळे वाढीव खर्चाचा बोजा सदर प्रकल्पावर येत असणे, त्याचबरोबर सदर प्रस्तावित भूमिगत मार्गाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सदर मार्ग अस्तित्वातील रस्त्याच्या खालून न जाता, अस्तित्वातील सुमारे चाळीस वर्ष जुन्या, जवळपास ५० इमारतींच्या खालून जात असणे, या बाधित, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, हा देखील या भूमिगत मेट्रोच्या प्रस्तावित मार्गीकेमुळे अडचणीत आला असणे, भूमिगत मेट्रो मार्गामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करण्यासाठी व त्यातून मार्ग काढण्यासाठी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन समिती तयार करणे आवश्यक असणे, तसेच मेट्रोचे काम कुठल्याही परिस्थितीत थांबू न देण्यासाठी लवकरात लवकर उपरोक्त प्रश्नांवर तोडगा काढून नागरिकांना देखील दिलासा देण्याची आवशक्यता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

(८) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात केवळ २४ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तब्बल ७६ टक्के विद्यार्थी अद्यापही आरोग्य तपासणीपासून वंचित राहिले असल्याची बाब प्रजा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून समोर आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून होणारी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

हा विभागाचा सर्वोत्तम उपक्रमांपैकी एक असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या तीन लाख अठरा हजार दोन विद्यार्थ्यांपैकी केवळ ८४ हजार २४७ विद्यार्थ्यांची आजतागायत आरोग्य तपासणी करण्यात आलेली असणे, तसेच सन २०१४ - २०१५ ते सन २०२१-२०२२ दरम्यान शिक्षण विभागाकडून होणाऱ्या आरोग्य तपासणी उपक्रमात ५८ टक्क्यांची घट दिसून आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे आरोग्य तपासणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची होत असलेली हेळसांड, कोविड काळानंतर आणि मुंबईत पसरलेल्या विविध साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने असलेली आरोग्य तपासणीची असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री महादेव जानकर,** नागोराव गाणार, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने सहायक प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीला त्वरित परवानगी देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावरील मानधन वाढीसंदर्भात, व दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबतच्या प्रमुख मागण्या अद्यापी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्यात गेल्या १० वर्षामध्ये प्राध्यापक पदभरती नियमित व पुर्ण क्षमतेने झालेली नसल्याचे उघडकीस येणे, ७५ टक्के भरतीला परवानगी असतानाही नियमित भरती केलेली नसणे, सन २०१४ पासून आजपर्यत प्राध्यापक पदभरती सातत्याने कपात करण्यात येणे, सन २०१७ पासून महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने महाराष्ट्रातील उच्चशिक्षित तरुण NET, SET, PHD पात्रता धारकांना न्याय मिळावा, विदयार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे याकरिता रस्त्यावर उतरुन आंदोलने केलेली असणे, आतापर्यत केवळ २ ते ३ हजार प्राध्यापकांची भरती शासनाने केलेली असणे, अद्याप हजारो जागा रिक्त असणे, दिनांक २५ मे, २०१७ ला आकृतीबंधाच्या नावाखाली प्राध्यापक पदभरतीवर बंदी घालण्यात येणे, उच्च शिक्षणातील अशासकीय, शासकीय, अकृषी विद्यापीठातील आकृतीबंध मंजुरीसाठी भरती बंद केली त्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ चा आकृतीबंधानुसार दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ साली दिनांक

अग्रिम प्रत

१ ऑक्टोंबर, २०१७ च्या आकृतीबंधाला उच्च स्तरीय सचिव समितीने तत्वता मान्यता देण्यात येणे, त्यानुसार अध्यापक संवर्गातील (सहायक प्राध्यापक) एकूण रिक्त पदांच्या ४० टक्केनुसार ३५८० पदांच्या भरतीला मान्यता देण्यात येणे, व या पदांची भरती सुरु होती परंतु कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर दिनांक ४ एप्रिल, २०२० रोजी या भरतीला देण्यात आलेली स्थगिती, परंतु कोव्हिड-१९ संपल्यानंतरही भरती सुरु होत नसल्याने दिनांक १९ एप्रिल, ते १६ सप्टेंबर, २०२१ दरम्यान नवप्राध्यापक संघटनेच्या वतीने शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणे, सदर आंदोलनादरम्यान तत्कालिन उच्च शिक्षणमंत्री यांनी दोन महिन्यांत प्राध्यापक पदभरती सुरु करण्याचे दिलेले आश्वासन, कोव्हिड-१९ मध्ये बंद पडलेली भरती सुरु करण्यांसदर्भात दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ ला २०८८ उर्वरित पदांच्या भरतीला परवानगी देऊन शासन निर्णय पारित करण्यात येऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप पदे भरण्यात आलेली नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुसार, प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांसदर्भात महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने अनेक आंदोलन व उपोषणे, करुनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सहा.प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीच्या त्वरित देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावर मानधन वाढीसंदर्भात, व १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबत सत्वर निर्णय घेऊन प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

(१०) **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हाफकीनच्या कार्यप्रणालीमुळे रुग्णालयांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, दैनंदिन सर्जिकल साहित्य मागणीनंतर पुरवठ्यामध्ये साधारण वर्षभराचा फरक वाढल्याने तुटवडा होऊन रुग्णसेवेत अडचणी येत असणे , हाफकीनची खरेदी प्रणाली अत्यंत वेळ खाऊ असून संचालनालय येथे करण्यात येणारी मागणी ते डीएमई मार्फत पडताळणी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवणे, नंतर हाफकिन महामंडळाद्वारे निविदा प्रक्रिया राबवणे अशा किचकट प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष पुरवठ्यात विलंब होत असणे, संस्था स्तरावर वस्तू व पुरवठा लेखाशीर्ष २९ मधून प्राप्त निधीतून ९०% निधी हाफकीन महामंडळाकडे वर्ग झाल्यानंतर ८० % साहित्य प्राप्त होणे अपेक्षित असताना उर्वरित १०% टक्के निधीतून औषधी तसेच सर्जिकल साहित्य प्राप्त होण्यास अडचणी येत असणे,

अप्रकाशित प्रत

रुग्णांची गैरसोय होत असल्यास निदर्शनास येत असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली असणे, सदर मंडळाचे बळकटीकरण करणे, मनुष्यबळाची अडचण दूर करून ऑनलाइन प्रणाली गतिशील करणे, वस्तू पुरवठा अबाधित राहण्यासाठी अंदाजपत्रक रुग्णसंख्या व प्रत्यक्ष खाटाच्या संख्येवर ठरवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (११) ते (१४)] —**

**(११)** **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रवीण दटके, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, सुरेश धस, निलय नाईक, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्र.१९४A/६ व १९४ A/७ या आरक्षित भुखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्या सुमारात निदर्शनास येणे, सदर मौजे घाटकोपर येथील भुखंड गृह विभाग, रेल्वे पोलीस वसाहत व रेल्वे हेडक्वाटर्स यांच्या वापरासाठी मे.क.सो यांचेकडील ऑर्डर नं.C/LND/SR-V/७५५ दिनांक २१/०२/१९६४ नुसार पोलीस वसाहतीसाठी देण्यात येणे, सदर जागेचा अन्य कामासाठी उपयोग करावयाचा नाही, जर गृह विभागाला सदर जागा नको असेल तर ती महसूल खात्याकडे परत देण्याची आहे, असे स्पष्ट आदेश देण्यात येणे, या संदर्भात विविध संघटनांनी तलाठी, घाटकोपर यांच्या अहवालानुसार अभिलेख अहवाल तपासले असता सदर पेट्रोल पंपासाठी परवानगी दिल्याची कागदपत्रे राज्य शासनाकडील/जिल्हाधिकारी यांच्याकडील ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याची नोंद नसल्याची बाब आढळणे, सदर जागेवर भारत पेट्रोलियम यांच्या पंपाचे काम पूर्ण होऊन पंप विनापरवाना चालू असणे, याबाबतीत सदर आरक्षित भुखंडावर बृहन्मुंबई महानगर पालिका विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार राखीव जागेसंदर्भातील आरक्षण बदलण्यासाठी महापालिका आयुक्त यांची परवानगी तसेच महसूल खाते व गृह खात्याची ना-हरकत प्रमाणपत्र न सादर करता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव (विशेष) यांनी बांधकामाच्या परवानग्या कशाच्या आधारावर दिल्या हे अनाकलनीय असणे, त्यामुळे मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्र.१९४A/६ व १९४ A/७ या आरक्षित भुखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

(१२) **श्री. कपिल पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महापालिकेच्या मालमत्ता करातून राज्यातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांना अनुदानित, विनाअनुदानित असा भेदभाव न करता वगळण्याची आवश्यकता असणे, एसआरए अंतर्गत शाळांच्या पुनर्विकासाठी शासनाने एफएसआय संदर्भात केलेली तरतूद मुंबईच्या नवीन विकास नामावलीत पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या शालेय इमारतीमध्ये खाजगी शाळांच्या वर्गाकरीता भाडेतत्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी सवलतीच्या दरात वार्षिक भाडे आकारण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या वर्गखोल्यात भरणाऱ्या रात्रशाळांना भाडे पूर्णपणे माफ करण्याची गरज असणे, मुंबईतील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस अथवा ग्रँटीनियन कोड लागू करुन मुंबई महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त १०४ खाजगी प्राथमिक शाळांना १०० टक्के अनुदान देण्याची आवश्यकता असणे, मुंबई महापालिका व खाजगी शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे, महापालिकेत १० वर्षे पूर्ण करणाऱ्या लिपीक व लेखा परीक्षकीय कामगारांना विनाअट कालबध्द रिक्त पदावर नियमित पदोन्नती देणे, मुंबई महापालिकेतील कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना आणि त्याच्या कुटुंबियांना रु. १० लाख संरक्षण असलेली वैद्यकीय गटविमा योजना लागू करणे, महापालिकेतील विविध संवर्गातील ४७ हजार रिक्त पदे भरण्याची गरज, तसेच इंडियन कौन्सिल अथवा इंडियन मेडिकल कौन्सिलने प्रस्तृत केलेल्या सर्व आस्थापनेवर परिचारिकांची पदे निर्माण करुन रिक्त पदे भरणे, सफाई खाते, मलनि:सरण खाते, बाजारखाते व रुग्णालयातील कामगार मानवी मलमूत्र व इतर घाणीशी संबंधित कामकाज करत असल्याने त्यांच्या वारसांना शैक्षणिक अर्हतेमुळे पालिकेत नोकरी आणि मोफत हक्काची घरे देण्याची आवश्यकता असणे, यामुळे महानगरपालिकेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सफाई कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामध्ये पसरलेला प्रचंड असंतोष आणि संताप याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही."

(१३) **डॉ. सुधीर तांबे**, सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. वजाहत मिर्झा, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस योजना लागू असून नगरपालिका संचालित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना डीसीपीएस योजना लागू नसल्यामुळे निवृत्तीनंतर शासनाचे लाभ व विमा यापासून सदरचे नगरपालिका शिक्षक व

शिक्षकेत्तर कर्मचारी वंचित राहणार असून शासनाचा कोणताही लाभ त्यांना मिळणार नसणे तसेच, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी कुटुंब सेवानिवृत्त वेतनधारकांचे ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची शासनाच्या हिस्स्याची ५० टक्के रक्कम पहिला, दुसरा, तिसरा हप्ता तसेच मागील दोन वर्षाचे महागाई भत्त्याचे सर्व फरक उत्पन्नाची रक्कम अद्यापही शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना प्राप्त झालेली नसल्यामुळे सेवानिवृत्त सर्व शिक्षकांना निवृत्तीवेतनाच्या रकमेपासून वंचित राहावे लागल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी त्यामुळे त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत दोन्ही विषयांबाबत चौकशी करून नगरपालिका संचलित शाळांमध्ये शिक्षक व शिक्षक पत्र कर्मचारी योजना लागू करण्याबाबत व महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब सेवानिवृत्त वेतनधारकांचे निवृत्तीवेतनाचे कमी मिळालेले अनुदान व ऑक्टोबर २०२२ पासून पेन्शन तातडीने मिळणेबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत राज्य शासनाचे प्रतिक्रिया."

(१४) **श्री. जयंत आसगावकर**, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, अजूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळाबाह्य असणे, संचमान्यतेचे निकष बदलून गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तत्काळ सुरू करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकड्यांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरू केलेली नेमणूक रद्द करून कायमस्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत तातडीने सोडवणूक न झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर

अप्रकाशित पत्र

कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही आणि यावर शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री : (क)** "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद यांचे सन २००२-२००३ ते सन २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री : (क)** "सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

अमुद्रित प्रत

**(ख)** "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री :** **(क)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :** **(क)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ (२०२२ चा १७) चे कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या तसेच अनुदान दिलेल्या शैक्षणिक संस्थामधील अध्यापक संवर्गातील सर्व विषयातील मंजूर पदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण २०१९ / प्र.क्र.९४ / १९ / विशि-१ दिनांक ७ एप्रिल, २०२२" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(घ)** "उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक रूसाये- २०१९ / प्र.क्र. १८६ / -३, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ अन्वये हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ फंडाची तरतूद प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०१९ / प्र.क्र.१८५ / विशि-३, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) आदिवासी विकास मंत्री :** "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा विसावा वार्षिक" सभागृहासमोर ठेवतील.

**(६) उद्योग मंत्री :** **(क)** "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक हिशोब" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समिती (२०२१-२०२२) चा दुसरा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे."**

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(सोमवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) – [अनुक्रमांक (१) ते (५) ] –**

**(१) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सुकापूर या गावात इमारतीचा स्लॅब कोसळून मृत पावलेल्या कु.शुभम राजभर याच्या कुटुंबाला मदत जाहीर करणे तसेच या भागातील धोकादायक इमारती दुरुस्ती करण्यासाठी नैना प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागत असल्याने सिडको-नैना प्रकल्प रद्द करण्याबाबत."

**(२) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर महसूल मंत्री निवेदन करतील :-**

"सिरोंचा (जि. गडचिरोली) तालुक्यातील मेडीगड्डा धरणग्रस्त शेतकऱ्यांनी त्यांच्या अधिग्रहीत जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी केलेल्या आंदोलनाबाबत."

**(३) सर्वश्री शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अमोल मिटकरी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर महसूल मंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील गायरान जमिनीवरील बेकायदा बांधकामे हटविण्याचा शासनाने घेतलेला निर्णय व त्यामुळे बाधित नागरिकांनी केलेल्या आंदोलनाबाबत."

**(४) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

अप्रकाशित

"राज्यातील उद्योग परराज्यात जाऊ नयेत यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याबाबत."

**(५) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर कृषी मंत्री निवेदन करतील :-**

"औरंगाबाद जिल्ह्यात महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणेबाबत."

**(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"मौजे रोडपाली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील बौध्दवाडी सेक्टर १८, कळंबोली, सर्व्हे नं. २२, २६/१, २७/१, २८/१९, २९/१, ३०/१, ५०/१, ५७/१, ५७/२ या सिडकोच्या अखत्यारितीत असलेल्या भूखंडावर झालेले अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत."

**(७) श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील विविध भागात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होऊनही शेतकरी अद्यापपर्यंत आर्थिक मदतीपासून वंचित राहिल्याबाबत."

**(८) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील पोलिस पाटील यांच्या विविध मागण्यांबाबत."

**(९) श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

"जालना जिल्ह्यातील वाटुर फाटा ते परभणी जिल्ह्यातील चारठाणा या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत."

अग्रिम प्रत

(१०) **श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत."

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(१)** **श्री. अंबादास दानवे,** ॲड.अनिल परब, श्री अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सर्व्हे नं.१३/२/१, १६/२, ही जमिन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरीता दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरीता दि.३१.१२.२०१९ करीता सादर करण्यात येणे, याबाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, मा.जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र.गौखशा/कात-१/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावणी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.गौखशा / कात-१ / तुडाळ / दळवी / अन.उत्खनन/ २०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मूळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्य:स्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात

येणे, सबब याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. अमोल मिटकरी,** विक्रम काळे, शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्हयातील पंढरपूर नगरपरिषदेने प्रारुप विकास आराखडा (कॉरिडॉर) प्रकल्प तयार केला असून त्यास शासनाने सन २०१२ मध्ये मंजुरी दिलेली असणे, या आराखडयात पंढरपूर येथील अनेक भूखंड विविध प्रयोजनासाठी आरक्षित ठेवण्यात आले असून, अनेक रस्त्यांच्या रुंदीकरणाचे तसेच मंदिरापाशी यायला मोठे दोन रस्ते असताना चौफाळा व महाद्वार घाट यांचे नियंत्रण करणे अवघड असतांना अजून मंदिरापाशी यायला दोन मोठे रस्ते करण्याचा प्लॅन करत असल्याने सर्व गर्दी एकाच ठिकाणी एक झाल्यावर गोंधळ होऊन नियंत्रण करणे कठीण होण्याची भिती व्यक्त होत असणे, नवीन आराखडयात सर्व उपदेव मंदिर, काळभैरव, नवग्रह मंदिर, खंडोबा मंदिर, रेणूका माता मंदिर, मल्लिकार्जुन महोदव मंदिर, अकरा रुद्र मारुती मंदिर, संत नामदेवांचे वास्तव्य ठिकाण, संत तुकोबारायांच्या वंशज यांचे घर, काल्याचा वाडा, ताकपिठ विठोबा मंदिर, अनेक परंपरांगत मठ, संत महात्मे राहून गेलेली घरे ही ऐतिहासिक धरोधर असलेल्या वस्तु पुरातत्व विभागाकडून दुर्लक्ष करुन पाडण्याचा निर्णय होणे, मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने त्यांच्या दबावामुळे अधिकारी व प्रशासकीय यंत्रणेकडून दुर्लक्ष होणे, प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये अनेक सुविधा प्रस्तावित केलेला असणे, या सगळया सुविधा सध्या मंदिरात असताना कॉरिडॉर उभारण्याची आवश्यकता नसल्याच्या भावना नागरिकांकडून व्यक्त होत असणे, कॉरिडॉर ही योजना रद्द करण्याबाबत तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे राजापूर, ता.येवला, जि.नाशिक येथील युवकांनी गावातील चौकामध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिनांक २१/११/२०२० रोजी बसविणे, छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असल्याने गावातील युवकांनी महाराजांप्रती आदर व्यक्त करण्याच्याहेतूने गावातील चौकात पुतळा स्थापन करणे, परंतू गावातील काही युवकांवर परवानगी न घेता पुतळा स्थापन केल्यामुळे येवला पोलिस स्टेशनमध्ये भादंवी क, १४३, १४९, ४४७ सह

अप्रकाशित प्रत

महाराष्ट्र पुतळयांच्या विटंबनेस अधिनियम १९९७ चे कलम ११ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येणे, राज्याचे माजी मुख्यमंत्री महोदयांनी सदरील गुन्हे मागे घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येणे, तथापि सदर गुन्हे मागे घेण्यात आलेले नसणे, तसेच विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनीही येवला येथे दिनाक ३०/०७/२०२२ रोजी दौऱ्यावर असतांना सदर गुन्हे मागे घेण्याबाबतची घोषणा केलेली असणे, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गावात बसविणाऱ्या युवकांवरील गुन्हे तात्काळ मागे घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री अभिजित वंजारी,** राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील काही राईस मिलकडून मानवी खाण्यास अयोग्य असलेल्या तांदळाचा पुरवठा करून शासनाचे करोडो रूपयांचे नुकसान करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून यामध्ये प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील मिलधारकाकडून अशाप्रकारचा घोटाळा सातत्याने एक वर्षापासून सुरू असल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील मेसर्स देवीकमल राईस मिल, वडसा, देसाईगंज या गिरणीधारकाकडून जमा केलेला तांदूळ (लॉट नं. टीडीसी गडचिरोली/४) माहे मे, २०२२ च्या दरम्यान केंद्रशासनाच्या गुणनियंत्रण पथकाद्वारे दौरा कार्यक्रम असतांना शासकीय अधिकाऱ्यांनी हा लॉट जप्त करून पंचनामा करून त्याचे नमुने तपासले असता मनुष्याकरिता खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून येणे, केंद्रशासनाच्या पथकाकडून बेस्ट गोदाम टीडीसी, आरमोरी येथील तांदळाच्या तपासणीचा अहवाल जिल्हाधिकारी ( पुरवठा शाखा) गडचिरोली यांच्याकडे मानवी खाण्यास अयोग्य असल्याचा अभिप्राय आला असून अशा गिरणी धारकांवर जीवनावश्यक कायदा १९८० / १९५५(कलम ३ (i) व त्यामुळे सुधारणा, २०२० यानुसार काळ्या यादीमध्ये टाकणे आवश्यक असून प्रत्येक जिल्ह्यातील भात भरडाईकरिता अभिकर्ता संस्था यांच्याद्वारे आधारभूत खरेदी योजना अंतर्गत खरेदी झालेल्या धानाच्या भरडाईकरिता ज्या-ज्या राईस मिल जबाबदार असणे, त्यांच्यावर केवळ तीन वर्षाकरिता काळ्या यादीमध्ये नांव टाकून शिक्षा देणे पुरेसे नसून राज्य शासनाच्या योजनेचा अपहार केल्याप्रकरणी अशा प्रकारचा गैरव्यवहार करणाऱ्या सर्व राईस मिल मालकांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित

(५) **श्री. श्रीकांत भारतीय,** प्रा. राम शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अठरा वर्षावरील अनाथांचे कल्याण, पुनर्वसन व त्यांच्या विरोधी होणारे अत्याचार हा विषय महाराष्ट्र शासनाचा कोणत्याही विभागाच्या अंतर्गत न येणे, १८ वर्षावरील अनाथांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचा स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची तसेच अनाथ कल्याण महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता असणे, दिनांक ११/ २/ २०२० व २१ /१० /२०२० रोजी महिला बाल विकास विभाग अंतर्गत अनाथांच्या कल्याणासाठी प्रलंबित विविध मागण्यासंबंधी बैठक आयोजित होणे, या बैठकीत अनाथ मुले व मुली कल्याणासाठी खालील मागण्या जसे की अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अठरा वर्षानंतरच्या अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी विशेष विभाग स्थापन करावा, अनाथ विकास महामंडळाची स्थापना करावी, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १८ वर्षानंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची आवश्यकता, अनाथ मुलांना शालेय महाविद्यालयीन शिक्षणामध्ये शिक्षण मोफत द्यावे, शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांमध्ये अनाथांसाठी एक टक्का आरक्षण राखीव ठेवावा, अनाथ मुलांना शहर विकास आराखड्यामध्ये दिव्यांगांच्या धरतीवर भूखंड राखीव ठेवण्यात यावा, राज्य लोकसेवा आयोग व शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये खेळाडू व दिव्यांग यांना लागू असलेल्या पर्सेंटाईल गुण पद्धती अनाथांना देखील लागू करण्यात यावी या व इतर मागण्या सादर करण्यात येणे, सद्यस्थितीमध्ये अनाथांना केवळ शिक्षण व नोकरी यामध्ये आरक्षण लागू असून सदर आरक्षण शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये लागू करण्यात येण्याची आवश्यकता असणे, सद्यस्थितीत अनाथांसाठी उपलब्ध असणाऱ्या आरक्षण पद्धतीत सुधारणा करणे, शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत १८ वरील सर्व अनाथांना लाभ देण्यासाठी शासनाने विशेष शिबिर आयोजित करण्याची आवश्यकता असणे याबद्दल शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

## - मध्यंतर –

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री अंबादास दानवे,** उध्दव ठाकरे, ॲड. अनिल परब, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

"महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येत असणे, त्यावर महाराष्ट्र सरकारची प्रतिक्रिया, सन १९५६ साली झालेली भाषावार प्रांतरचनेमुळे मोठया प्रमाणात मराठी भाषिक जनता गेली ६६ वर्ष विविध मार्गांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करत असणे, कर्नाटक सरकारने पोलिसांच्या मदतीने अनेक खोटे गुन्हे मराठी भाषिकांवर दाखल करण्यात आलेले असणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना कृषी, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य आदी संबंधीच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असणे, मराठी भाषेत कोणतेही कागदपत्र न देणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेला स्वतंत्र भारतात दुर्लक्षित घटकासारखे जीवन जगावे लागत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयात सदर खटला प्रलंबित असतानाही कर्नाटक सरकारने बेळगाववर आपला हक्क सांगण्यासाठी खाजगी संस्थेच्या जागेत सन २००६ पासून अधिवेशन घेण्यास सुरुवात केलेली असणे, राज्यातील मंत्र्यांना व नेत्यांना बेळगावात येण्यास मनाई करण्यात आलेली असणे, काही कर्नाटक संघटनांकडून महाराष्ट्रातील वाहनांनवर दगडफेक करुन दहशतीचे वातावरण निर्माण करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष."

**आठ : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२"
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**
"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(३)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२"
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**
"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(४)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**
"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(५)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**(६)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ – महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) विधेयक, २०२२.

अग्रिम प्रत

**(७)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**नऊ : मुख्यमंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सुत्रानुसार फेररचनेची मागणी कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेली ८६५ गावे महाराष्ट्रात समाविष्ट व्हावी म्हणुन महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९.०३.२००४ रोजी मूळ दावा क्र.४/२००४ (Original Suit) दाखल केला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. IA ११ / २०१४ वर सुनावणी अंती दि. १२ सप्टेंबर २०१४ रोजी, दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी मा. कोर्ट कमिशनर म्हणुन मा. श्री. मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधिश जम्मु काश्मिर यांची नियुक्ती केली. परंतु सदर दि. १२ सप्टेंबर २०१४ रोजी पारित केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने दि. ०६ डिसेंबर २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. IA १२/२०१४ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. सदर सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असुन ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्ट्राच्या बाजुने खटला चालविण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी असणारे ज्येष्ठ, अनुभवी व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे.

**आणि ज्याअर्थी,** सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षोनुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर मा. समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या

अग्रिम प्रत

जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करुन त्याचे भुखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे तसेच अल्पसंख्य आयोगाने व मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपुर्वक केला जात आहे.

या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी दि. १४ डिसेंबर २०२२ रोजी मा. केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले असतांना देखील विपरीत भुमिका कर्नाटक शासनाने घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधीमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडुन जाणीवपुर्वक केले जात असुन कर्नाटक शासनाची ही भुमिका लोकशाही संकेतास धरुन नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी या बाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे.

**आणि ज्याअर्थी**, सद्यस्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ठ होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी / वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पुर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व इतर शासकीय संस्थांच्या मार्फत विहीत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**त्याअर्थी** आता महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे कर्नाटक प्रशासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ नुसार, -

**१.** कर्नाटकातील मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.

**२.** मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने

अत्यंत खंबीरपणे द्दढ निश्चयाने व संपुर्ण ताकदीनिशी लढा देण्यात येईल.

**३.** ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे.

**४.** तसेच याबाबत केंद्र शासनाने मा. गृह मंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत सरकारला समज देण्यात यावी.

**दहा : (क)** **सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, रामदास आंबटकर, प्रविण दटके, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, प्रा. राम शिंदे, श्री. श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेश कराड, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, निलय नाईक, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, रामराव पाटील, निरंजन डावखरे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री सुरेश धस, प्रविण पोटे-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे मात्र, विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजारचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्याचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना

अप्रकाशित प्रत

केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठण तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** **(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२, बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२, गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, प्रा. राम शिंदे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामराव पाटील, अमरीश पटेल, श्रीकांत भारतीय, प्रविण पोटे-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दटके, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री. राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** —

"महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध

अप्रकाशित प्रत

करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषत: अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरीता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरीता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**(ग)** **(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री विक्रम काळे, सतेज उर्फ बंटी पाटील, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, अब्दुलाखान दुर्राणी, अभिजीत वंजारी, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, राजेश राठोड, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, वजाहत मिर्झा, जयंत

अप्रकाशित

आसगावकर, सचिन अहिर, अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री आमश्या पाडवी, विप्लव बाजोरीया, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्याच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, विदर्भात कापसावर लाला रोगाचा व संत्र्यावर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र" ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व सन २०२१ मध्ये निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचा धान विक्रीअभावी पडून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे

अग्रिम प्रत

करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणताही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे संबधित अधिकारी मॅट मध्ये जावून उक्त बदल्या रद्द केल्याने यामध्ये शासनास आलेले अपयश, राज्याच्या इतर भागात होणाऱ्या ९२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे राज्यात येणारे प्रकल्प रखडले असणे, महाराष्ट्राचे उद्योग परराज्यात जाणे हे सरकारवर उद्योग जगताचा विश्वास नसल्याचे स्पष्ट होणे, शासनाच्या उदासिनतमुळे वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क अश्याप्रकारे बरेच प्रकल्प राज्याबाहेर जाणे, यातून एम.आय.डी.सी च्या उच्चाधिकार समितीची निष्क्रियता दिसून येणे, उद्योग मंत्र्यांनी शासनाचे अपयश लपविण्यासाठी राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगाबाबत मागील शासनावर जबाबदारी निश्चित करणे, मिहान प्रकल्पात ५५ गुंतवणुकदारांबरोबर करार झाला असताना फक्त ११ कंपन्या कार्यरत झाल्या असणे व फक्त ५९२५ रोजगार निर्मिती झाली असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-पैनगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्याच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, गत नऊ महिन्याच्या कालावधीत महिलांवरील अत्याचारामध्ये २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असतांनाही याबाबत शासन गंभीर

अग्रिम प्रत

नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब, वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे,** विलास पोतनीस, किशोर दराडे, **वि.प.स.**

"**औरंगाबाद जिल्ह्यात सहा वर्षांखालील कुपोषित बालकांच्या शोधमोहिमेत १ हजार २२८ अतितीव्र कुपोषित बालके, तर ६ हजार ८७७ मध्यम कुपोषित बालके आढळून आल्याबाबत**" या विषयावरील **श्री.अंबादास दानवे व इतर वि.प.स.** यांचा दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १०६०७ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, डॉ. मनिषा कायंदे, **वि.प.स.**

"**बृहन्मुंबई महानगरपालिकेची आणि रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत**" या विषयावरील **श्री.विलास पोतनीस व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १४८३७ ला दिनांक २७ जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २६ डिसेंबर, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

असुधारित प्रत